भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०४/२०१८

**१) खोटे दस्ताएवज तयार करून फसवणुक केल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक २१/१२/२०१७ ते दि. १६/०४/२०१८ पर्यत यातील आरोपीची पहीली पत्नी असतांना दुसरी पत्नीपासुन झालेल्या युश नावाचे मुलाचे जन्म प्रमाणपत्रावर पहील्या पत्नीचा (फिर्यादीचा) मुलगा नसुन सुध्दा त्याची आई म्हणुन नाव लावुन खोटे दस्ताएवज बनवुन पहील्या पत्नीची फसवणुक केल्याने फिर्यादी सौ. निर्मला राजेन्द्रकुमार पटले वय ४४ वर्ष रा. टि. बीटोली गोंदीया कुंजीलाल बिसने यांचे घरी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,४६८,४७१,४९४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) महिलेचा विनयभंग करून मारण्या-पीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक ०३/०३/२०१८ चे ०७.३० यातील आरोपीतांनी फिर्यादीचे घरातील बांधकामासाठी गाडलेल्या खुंटया उपडुन फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करून फिर्यादीचे 'विनयभंग करून मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३५४(ब),३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) बॅगमधील अतिआवश्यक साहित्याची व कामाचे कागदपत्राची चोरी :-**

दिनांक १०/०४/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी शेख शराजुद्दीन शेख अब्दुल नमिद शेख वय ४७ वर्श, रा. एम. आय. जी १/ ८२२ आमदीनगर हुडको भिलाई दुर्ग राज्य छत्तीगड हा आपले परीवारासह ३ बॅग, घेवुन नागपुरकडे जाणाऱ्या बसस्थानक भंडारा येथे प्लॅटफार्मवर बसत असता फिर्यादीचे गैरहजेरीत फिर्यादीचे मुलीला तुम्हाला १ बाई बोलावत आहे. असे बोलुन तिची नजर चुकवुन लहान बॅग ज्यात पासपोर्ट, कपडे ,प्रवासाचे तिकीट, चेकबुक, बॅक पुस्तीका, अति आवश्यक कामाचे कागदपत्र व कत्तार देशाचे चलन (रेआन) हे बॅगमधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन लाकडी ठोकळयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १६/०४/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने पैश्याचे देवान घेवानचे कारणावरुन फिर्यादीचे पती सोबत भांडण करुन थापड बुक्यांनी मारपीट करीत असता फिर्यादी ही भांडण सोडवण्यास गेली असता आरोपीने तिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून लाकडी ठोकळयाने तिचे डोक्यावर मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२३,२३४,५०६,२९४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोहवा. मांढरे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद:-**

दिनांक १५/०४/२०१८ चे २१.४५ वाजता दरम्यान यातील विधीसंघर्ष बालकाने रात्र दरम्यान कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे सुनेचे बेडरुम मध्ये प्रवेश करुन बेडरुम मध्ये ठेवलेले जर्मनचे डब्बे गोदरेजची आलमारी उघडुन तसेच आलमारीतील कपडे बाहेर काढुन खोलीत फेकुन चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी श्रीमती लिलाबाई लिल्हारे वय ६० वर्ष, रा. सालेखुर्द यांचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५७,५११ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेती पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) किराणा दुकानातील रोख-रक्कम व सामानाची चोरी :-**

दिनांक १५/०४/२०१८ चे २१.०० ते दि. १६/०४/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने रात्र दरम्यान दुकानाचे कोंडा कडी तोडुन दुकानाचे आत प्रवेश करून जय मॉ गायत्री किराणा दुकानातील वेगवेगळया तिन स्टीलचे एकुन ४१,३००/रु., रोख रक्कम व एक अॅशवर फेस पावडरचा डब्बा की. ५५/रु. , जय शक्ती किराणा दुकानातील एकुण ९,०००/रु. रोख रक्कम असा एकुण ५०,३५५/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी जितपालसिंग यशवंतसिह सोलंखी वय ४२ वर्ष रा. चुल्हाड यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जटाळ पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) शेतीचे वादावरून शिवीगाळ करून बासाचे काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०४/२०१८ चे १२.०० वाजता यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे मामा लागत असुन एकमेकांचे शेताला शेत लागुन आहे. यातील जखमी हा फिर्यादीने आरोपीस शिवधु–या वरील मातीचे ढेकले कशासाठी काडतोस म्हणुन हटकले असता, तुझ्या बापाचा होयका म्हणुन शिवीगाळ करून बासाचे काठीने डोक्यावर मारून आप खुशीने जखमी केल्याने, फिर्यादी हेमराज महादेव पुस्तोडे वय ५२ वर्ष रा. पिंडकेपार यांचे बयान व डॉ. मेमो व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लेंडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) शेतीचे वादावरून भांडण करून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०४/२०१८ चे १२.०५ वाजता यातील फिर्यादी जखमी व आरोपी हे सख्खे मामा भाचे लागत असुन त्यांची शेती एकमेकांचे शेताला लागुन आहे. यातील जखमी हा शिवधु–याचा मेराचा कचरा काढत असतांना यातील आरोपीने माझे शिवधु–याचा मेराचा कचरा कशाला काढतोस असे म्हणुन भांडण व शिवीगाळ करून फिर्यादी जखमीचे डोक्यावर काठीने मारून दुखापत केल्याने फिर्यादी विनायक यशवंत कापगते वय २५ वर्ष रा. पिंडकेपार यांचे बयान एमएलसी रिपोर्ट वरू पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंळगे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो वाहन ही साकोली येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**१०) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १६/०४/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो वाहन ही मुरमाडी तुप येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**११) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन साकोली,पालांदुर व अडयाळ येथे अवैध हातभट्टी +देशी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३२ लिटर हातभंट्टी दारू किंमती ३,२००/रु. व ०७ लिटर ३८० मिली लिटर देशी दारु + १ मोटार सायकल किंमती ७,१८२/–रु. तसेच जुगारातुन १५८/रु. असा एकुण किंमती १०,५४०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १५/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०८, तीन सिटर वाहनाकरीता– ०४ ईतर वाहनांवरती – १२४ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रगती लांजेवार)**
**महिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.